पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३४९/२०१५
दिनांक : ३०/०४/२०१५

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०६/०५/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

दिनांक : **०६/०५/२०१५** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागशः मंजूर विकास योजनेत मौजे तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आलेला आहे. सदर विकास योजनेच्या रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी प्रथम टप्प्यातील ५२.० ते ६०.० मी. रुंद रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १ पिंपरी यांचे कार्यालयात सुरु आहे. सदर ९०.०० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकाकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटर ऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याबाबत स्पाईन रस्त्याचे आखणीबाबत नियुक्त समितीने अंतिम केलेल्या आखणीनुसार / सुचविलेनुसारची प्रस्तावित ७५.०० मी. रस्त्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु आहे. सदर फेर बदलाची प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविलेप्रमाणे ७५.०० मी.रुंद प्रस्तावित रस्त्याच्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेचे व तद्अनुषंगाने येणारा खर्च करणेचे अधिकार मा.आयुक्तांना देणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.-७९५/०५/नवि-१३, दिनांक – ३०/०५/०८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०८/८९४/सी आर-१७२७/०९/नवि-१३,

दिनांक – १८/०८/०९ अन्वये भागशः मंजुर विकास योजनेतील विषयांकित मिळकतीमधून जाणारा ३०.० मी. रुंद रस्ता व २४.० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. मौजे च-होली येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने विषयांकित मिळकतीमधील ३०.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४५८ पै., ४५९ पै., ४६२ पै., ३८३ पै., ३६३ पै.,) व २४.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४६२ पै., ४५८ पै., ४६३ पै., ४६४ पै.,) ( पूर्व-पश्चिम रस्ते विकसित करणे आवश्यक आहे.) रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकांचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. विषयांकित जमिनीचे प्रचलित भुसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी विषयांकित रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३४९/२०१५
दिनांक : ३०/०४/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.